# स्वाभिमानी ॲग्रो प्रॉडक्टस् प्रोड्युसर कं. लि.

ग. नं. १०२१ काळम्मावाडी वसाहत रोड, उदगाव, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर
फोन (०२३२२)२२२१२७. मो. ९६५७७२३७५७, ९६८९९३८४१४, ९६५७७२३७५५

## पाहिजेत

आमच्या विस्तारित दैनंदिन १००००० लिटर दूध हाताळणी क्षमेतच्या अद्ययावत दुग्ध प्रकल्पासाठी खालील पदे तत्काळ भरणेची आहेत.

| अ. नं. | पदाचे नाव | शैक्षणिक पात्रता | पद संख्या |
|---|---|---|---|
| १ | टेक्निकल ऑफिसर | बी.टेक (फुड)/आयडीडी (डीटी)/बी.एस्सी. (केमिस्ट्री) | ४ |
| २ | कॉलिटी कंट्रोल ऑफिसर | आयडीडी (डीटी)/बी.एस्सी. (केमिस्ट्री) | २ |
| ३ | मायक्रोबायोलॉजिस्ट | बी.एस्सी. (मायक्रोबायोलॉजी) | २ |
| ४ | केमिस्ट | बी.एस्सी. (केमिस्ट्री) | ५ |
| ५ | प्रोसेस प्लँट ऑपरेटर | आयटीआय इले./फिटर. रेफ्रिजरेशन | ४ |
| ६ | रेफ्रिजरेशन ऑफरेटर | आय.टी.आय. रेफ्रिजरेशन | ३ |
| ७ | पशुधन अधिकारी | पशुधन पर्यवेक्षक डिप्लोमा (एलएसएसढ) धारक | ७ |
| ८ | इलेक्ट्रिशन | आयटीआय इलेक्ट्रिशन | ३ |
| ९ | फिटर | आयटीआय फिटर | ३ |
| १० | मार्केटिंग पर्यवेक्षक | १२ वी पास | ५ |

वरील सर्व पदांकरिता दुग्धप्रकल्पाकडील ३ ते ५ वर्षांचा अनुभव असणाऱ्या इच्छुक व पात्र उमेदवारांनी वरील पत्त्यावर नाव, पत्ता, शिक्षण, पुर्वानुभव, सध्याचा पगार, अपेक्षित पगार, फोन नंबर इ. माहितीसाठी सात दिवसांत आपले अर्ज पाठवावेत.

**मुख्य कार्यकारी अधिकारी**


स्वाभिमानी विचार

Book-Post

प्रति,

RNI No. - MAH/MAR/2005/16213 Rgd. No. L2/17/RNP/ K.L.P/234/09-11

वर्ष ६ | अंक १५ | १ जुलै २०११ | किंमत ५ रुपये | पाने २०

# स्वाभिमानी विचार

RNI NO-MAH/MAR/2005/16213
REGD NO - K.L.P/234/09-11

संपादक : खासदार राजू शेट्टी

# ५ लाख टन साखर निर्यातीला परवानगी

## खासदार राजू शेट्टी यांच्या प्रयत्नाला यश



नवी दिल्ली (प्रतिनिधी) : साखरेच्या निर्यातीला केंद्र सरकारकडून म्हणावा तसा प्रतिसाद मिळत नव्हता, त्यामुळे साखरेचे भाव ढासळत चाललेले होते. खासदार राजू शेट्टी यांनी अर्थमंत्री प्रणव मुखर्जी यांची भेट घेऊन साखर निर्यातीला परवानगी द्यावी, अशी आग्रही मागणी केलेली होती. त्वरीत परवानगी देऊ अशी ग्वाहीही त्यांनी दिलेली होती. त्यानुसार केंद्र सरकारने आणखी ५ लाख टन साखरेला निर्यात करण्याची परवानगी दिलेली आहे.

केंद्रीय अन्न व नागरी पुरवठा मंत्री थॉमस यांनी दिवाळीपर्यंत साखर निर्यात होणार नसल्याचे संकेत दिले होते. या पार्श्वभूमीवर खासदार राजू शेट्टी यांनी दि. १८ जून रोजी केंद्रीय अर्थमंत्री



प्रणव मुखर्जी यांची भेट घेतली. त्यावेळी बोलताना खा. शेट्टी म्हणाले, जवळपास महिनाभर पाठपुरावा केल्यामुळे केंद्राने ५ लाख टन साखरेला परवानगी दिली. अजून साखर निर्यात होणे गरजेचे आहे. त्यासाठी आमचा पाठपुरावा सुरू आहे. जागतिक बाजारपेठेत अजून ब्राझीलची साखर आली नसल्याने दर चांगले असून, त्यामुळे निर्यातीची संधी असल्याचे मुखर्जी यांनी सांगितले. देशात या हंगामात २४५ लाख टन साखर उत्पादीत व गेल्यावर्षीची ५० लाख टन अशी २९५ लाख टन साखर शिल्लक आहे. देशात साखरेची २३० टन गरज आहे. त्यामुळे ६५ लाख अतिरिक्त साखर आहे. पुढील हंगामात ४.७ टक्के उसाचे क्षेत्र वाढले आहे. २९०

पान ३ वर ▶





गणेश बेकरी नांदणी

ISO 9001 2000 CERTIFIED COMPANY

ताजे व स्वादिष्ठ पदार्थांची रुचकर मालिका....

फरसाणा (नमकीन) ● स्विटस् ● वेफर्स ● बेकरी प्रॉडक्टस्

A/p: Nandani, Tal: Shirol, Dist: Kolhapur. Pin: 416 102 Maharashtra (INDIA) Ph: 02322 - 235952 / 234052 Fax: 02322 -235852 E-mail: ganesh_bakery@yahoo.co.in

# इंधन दरवाढ सर्वसामन्यांच्या मानगुटीवर

केंद्राने काही दिवसापूर्वी डिझेल ३ रूपयांनी तर एलपीजी गॅस सिलिंडर ५० रूपयांनी वाढवली. यामुळे महागाईत होरपळलेल्या जनतेला केंद्राने पुन्हा एकदा आगीत ढकलेले आहे. एकीकडे सरकारी कर्मचाऱ्यांचे पगार भरमसाठ वाढला जातो आहे. त्यातच गोरगरिब भरडला जात आहे. त्यामुळे देशात महागाईचा भडका उडणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

इंधन दरवाढीचा मोठा फटका शेतकऱ्यांना बसलेला आहे. आधीच शेतकरी कर्जाच्या खाईत लोटला गेला असताना पुन्हा इंधनदरवाढ करून त्यांनाही या महागाईत होरपळो लागणार आहे. डिझेल नि रॉकेल माफिया उदयास आले आहेत. त्यांनी कोट्यवधी रूपयांची बेहिशोबी मालमत्ता साठवली आहे. त्यांच्यावर कोणचाच अंकुश नाही. इंधन दरवाढीमुळे ट्रान्सपोर्ट व्यवसाय अगोदरच शेवटची घटका मोजत आहे. म्हणून कहर म्हणून की काय केंद्र सरकारने इंधन दरवाढ केली. पूर्वी ५२ रूपयेला मिळणारे गॅस सिलिंडर सध्या ४१३ रूपयांचा आकडा गाठलेला आहे. आगामी काळात ५०० रूपयेच्यावर देखील जाण्याची शक्यता आहे. पेट्रोल ७० रूपये लिटर झालेले आहे. केरोसिन १५ रूपये झालेले आहे. सध्या ग्रामीण भागात शेतीला ८तास वीज पुरवठा सुरू असतो. अनेक शेतकऱ्यांनी या भारनियमनाला पर्याय म्हणून विहीरीवर डिझेल इंजिन बसविलेले आहे. त्यालाही मोठा फटका बसणार आहे. तसेच बहुतेक करून शेतातील मशागतीचे कामे ट्रॅक्टरद्वारे केली जातात. त्यामध्येही मोठी दरवाढ होणार आहे. भाजीपाला ने - आण मध्ये मोठी भाडे वाढ केली जाणार आहे. याचा फटका शेतकऱ्याला बसणार आहे. आणखी किती सहन करायचे? अलिशाल महालात राहून सर्वसामान्यांच्या यांना काय व्यथा कळणार? हे किती दिवस चालणार? सरकार आणखी लुबाडणूक करून स्वःताची पोटे भरवून घेतली जात आहेत.

**संपादकीय**
**डॉ. महावीर अक्कोळे**
mahaveerakkole@gmail.com

डिझेलची दरवाढ लागू केली नि देशात महागाईचा आगडोंब उसळला गेला. कर्जबाजारी झालेल्या नागरिकाला महागाईत सरकार होरपळून सोडणार आहे. दुर्गम भागात सध्या एसटी शिवाय वाहतुकीला पर्याय नाही. या इंधनदरवाढीमुळे एसटीच्या भाडेवाढीत ८ ते १० टक्क्यांनी वाढ होणार आहे. त्याचा मोठा फटका ग्रामीण भागातील लोकांना बसणार आहे. शेतकऱ्यांची सरकारने वाट तर लावली आहे. ग्रामीण भागातील गरीब माणसांना या महागाईचा फटका बसणार आहे. केंद्राने फक्त तेल कंपन्यांचा विचार केला आहे. त्यांच्या तोट्याचा विचार केला जातो. मग शेतकऱ्यांचा नि सर्वसामान्य जनतेचा का विचार केला जात नाही. सरकार घामाचे पैसे खाते मात्र त्या घामाला दाम मात्र देत नाही. सरकारी कर्मचाऱ्यांचे लाड या सरकारनेच पुरवलेले आहेत. त्यांना गलेलठ्ठ पान ३ वर ▶

शेतकरी संघटना स्वाभिमानी

◆ वर्ष ६ ◆ अंक १५ ◆१ जुलै २०११ ◆ **संपादक :** खासदार राजू शेट्टी Email : rajushetti@gmail.com
◆ **कार्यकारी संपादक : डॉ. महावीर अक्कोळे** ◆ **सह संपादक : डॉ. श्रीवर्धन पाटील, जगदीश इनाम दार** ◆ **निवासी संपादक : सदाभाऊ खोत** ◆**मानद सल्लागार : मा. श्री. अण्णा हजारे** राळेगणसिद्धी, **न्या. पी. बी. सावंत** पुणे, **न्या.बी.जी.कोळसे पाटील** पुणे, . **प्रा. शरद पाटील** सांगली, **कुमार सप्तर्षी** पुणे, **माजी आमदार. वामनराव चटप** चंद्रपूर ◆ **व्यवस्थापक :** सुभाष शेट्टी ◆ **कार्यालय :** भरत पतसंस्थेच्या माडीवर, पोलीस स्टेशनसमोर, जयसिंगपूर, ता. शिरोळ. फोन : (०२३२२) २२४३२७

**SWABHIMANI VICHAR (Fortnightly)** स्वाभिमानी प्रतिष्ठान संचलित पाक्षिक स्वाभिमानी विचार हे पत्र संपादक ✲खासदार राजू उर्फ देवाप्पा आण्णा शेट्टी यांनी स्वाभिमानी शेतकरी संघटना मध्यवर्ती कार्यालय, ९ वी गल्ली, राधाबाई रोड, पोलिस स्टेशननजीक, जयसिंगपूर-४१६ १०१, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर, (महाराष्ट्र राज्य) येथे प्रकाशित केले. प्रकाशन स्थळ : स्वाभिमानी शेतकरी संघटना मध्यवर्ती कार्यालय, ९ वी गल्ली, राधाबाई रोड, जयसिंगपूर-४१६ १०१, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर (महाराष्ट्र राज्य). दूरध्वनी : (०२३२२) २२४३२७. मुद्रण स्थळ : सुनील प्रिंटर्स, जयसिंगपूर. फोन (०२३२२) २२४३२७ पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी ✲ यांची आहे. पाक्षिक स्वाभिमानी विचारमधील सर्व लेखांचे हक्क राखून ठेवण्यात आलेले आहेत. **Decleration No. Desk No. VII Home N.P.S.R./58/2005 RNI No. MAH/MAR/2005/16213 या अंकातील लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.**

वार्षिक वर्गणी
रु. १००/-

# ५ लाख टन साखर निर्यातीला परवानगी



▶ पान १ वरुन

लाख टन साखरेचे उत्पादन अपेक्षित आहे. त्यामुळे साखरेची कमतरता भासणार नाही. हे अर्थमंत्र्यांना पटवून दिले. देशांतर्गत बाजारपेठेत साखरेचे दर कमी असल्याने कारखान्यांकडे साखर ठेवण्यास जागा नाही. गोडावून हाऊसफल्ल झाल्याने उघड्यावर साखर ठेवावी लागत असल्याने कारखानदारांची कोंडी झालेली आहे. या संदर्भात मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनीही पंतप्रधान व अर्थमंत्र्यांची भेट घेतलेली होती. निर्यातीसंदर्भात केंद्र सरकार सकारात्मक विचार करून त्वरीत आणखी साखर निर्यात केली जाईल, अशी ग्वाहीही ना. मुखर्जी यांनी खा. राजू शेट्टी यांना दिलेली होती. त्यानुसार केंद्र सरकारने ५ लाख टन साखर निर्यात करण्याची परवानगी दिली. त्यामुळे साखरेच्या दरात थोडीफार सुधारणा होईल.

# इंधन दरवाढ सर्वसामन्यांच्या मानगुटीवर

▶ पान २ वरुन

पगार दिला जातो. मग हा न्याय सर्वसामान्यांना का लावला जात नाही. अनेक वर्षे गरिबीत तिष्ठित पडलेल्या गरिबांना आता वालीच उरला नसल्याचे स्पष्ट झाले आहे. शेतकरी उपाशी नि नोकरदार तुपाशी लोळत आहेत. किती दिवस हा अन्याय आपण सहन करायचा? शेतकऱ्याला खरचं कोण वाली नाही का? त्याने किती दिवस रडत बसायचे? आंधळ दळंत कुंत्र पिठ खातं याप्रमाणे सरकारचा कारभार सुरू आहे. अन्याय सुरू आहेत, झालेले आहेत नि होणारही आहेत. त्यावर अंकुश घालण्यासाठी एकठे अण्णा हजारेंनी उपोषण करून चालणार नाही. जनतेतूनच उठाव झावा पाहिजे. तरच ते सामर्थ्य जनतेमध्ये येईल, अन्यथा निगरगट्ठ राजकारणी जनतेचे रक्त पितचं बसतील.


TEXMO
TEXMO INDUSTRIES
५२ वर्षांची विश्वासाची परंपरा

Taro
SKF Ball Bearings
BHARTIA CUTLER-HAMMER BCH स्टार्टर
जैन एच.डी.पी.ई. पाईप्स्
अधिकृत विक्रेते
बाहुबली इलेक्ट्रिकल्स
आझाद रोड, ८वी गल्ली,जयसिंगपूर.
फोन:(०२३२२)२२५९०५,२२७४०५ मोबा.:९४२११७३१४७
गोमटेश इलेक्ट्रिकल्स
जामे मस्जिद समोर, मेट्रो ऑटोजवळ,पटेल चौक,सांगली.
फोन नं.(०२३३) २६२१०९६ मोबा.:९९६०४०६३१३

TEXMO
AQUATEX
अधिकृत विक्रेते
श्री वितराग एंटरप्रायझेस
सोन्या मारुती मंदिरासमोर, कोल्हापूर रोड, इचलकरंजी
फोन : (ऑ.) ०२३०/२४३४१०८
मोबा. : ● विपुल - ९३२६९५३०२७ ● बाबासाहेब : ९३२५७६१२२१


प्रोप्रा. अरुण किर्तीकुमार माणगावे
M/S. MANGAVE BOREWELLS
BOREWELL CONTRACTOR
Opp. Mangave Petrol Pump. Jaysingpur. Dist : Kolhapur (M.S.)
Ph. (02322) 229866. Mo. 9822551008/9422428266


Shree Datta Prestrestess
M.f. PCC Pole
Shirol Road, Jaysingpur.

# उसांच कांडकं शेतकऱ्याच्या पाठीत

शेतकरी कोणत्या ना कोणत्या कारणाने वेगवेगळ्या संकटांमध्ये गुंतलेला दिसून येतो. त्यावरून त्याच्या अस्थिरतेची कल्पना येते. तो थोडका काळ हसतोही. पण अशा हसणाऱ्यांची संख्याही अल्पशीच. काही पिके ही नियमित वापरासाठी आवश्यक असल्याने त्यांचा खप वर्षभर चालू असतो. कधी भाव पडले तरी तो माल विकावाच लागतो किंवा विकला जातोच.



पण महाराष्ट्रात नगदी पिकापैकी ऊस हे एकमेव असे पीक ठरावे, की त्याचा थेट कारखान्यांशी संबंध येतो. त्यामुळेच उसाला किमतबी भांडून - तंडून तरी तसी बरी मिळते. ऊस हे पीक भाजीपाल्यासारखे नाशवंत असले तरी ते काही काळ टिकू शकते. पण त्या टिकण्यात पिकाची रया जातेच. शेतकरीही तोट्यात येतो.

आपल्याकडे खासगी व सहकारी साखर कारखाने जागोजागी उभे आहेत. त्या कारखान्यांच्या दिमतीला शासन उभे आहे. अगदी कारखाना उभारणीपासून ते साखर निर्यातीपर्यंत आपले शासन लोकहितासाठी कायम राबताना दिसते. हे लोकहित असते गरिबापासून ते श्रीमंतापर्यंतच्या सांज - सकाळच्या चहासाठी. साखर कारखान्यांनी किती गाळप करावे व केव्हा ऊस गाळप करावे इथपर्यंत शासनाचे नियंत्रण असते असे सांगितले जाते. या साखर कारखान्यांची संगणकीय माहिती साखर आयुक्तालयाशी जोडलेली असते. म्हणजे अशी नियंत्रणाची केवढी मोठी साखळी असते. पण तरीही मधून - मधून कधी मोठी माशी शिंकतेच. अर्थात दरवर्षी शिंकणारी माशी वेगळीच. काय घडतं असं, की एवढी सारी साखळी शिल्लक असतानाही शिल्लक उसाचा नेहमीच पावसाच्या तोंडावर उभा राहतो. गेल्या वर्षीही अशाच पध्दतीनं काही कारखांच्या कार्यत्रक्षेत्रात ऊस शिल्लक राहिलेला आहे. ज्यांची ऊसे शिल्लक राहतात ती बहुधा विरोधी गटातीलच असतात. अथवा एखादा गरीब शेतकरीच या साखर कारखान्याच्या राजकारणात नागला जातो. या उसाच्या पिकाला राजकीय वाळीवही लागलेली आहेत. कधी तरी या गोष्टीकडे शासनाला लक्ष द्यायला वेळ मिळेल का, असा प्रश्न निर्माण झालेला आहे. सातारा परिसरीसरातील काही साखर कारखान्यांनी उभा ऊस पेठवून दिला त्यामुळे तोडणी सोपी झाली. काय ही तऱ्हा म्हणायची. ज्या शेतकऱ्याने वर्षभर काबाड कष्ट करून शेतात अहोरात्र घाम गाळून ऊस पिकविला. तो ऊस अंतिम टप्प्यात आल्यावर पावसाच्या तोंडावर जाळला. व जळका ऊस गाळपासाठी ट्रकमध्ये भरून नेला. त्यांच वजन काय हे शेतकऱ्याने विचारयाची गरजच नाही. कारण यालाच म्हणतात. नियोजन. गेल्या वर्षी साखरेवे चाळीशी ओलांडली. त्यामुळं सामान्य जनतेपासून मोठ्या माणसापर्यंत चहा महाग झालं. परिणामी साखर कारखन्यांची चंगळ झाली. अनेक साखर कारखान्यांनी गळेकापू स्पर्धा केली. उसाचे क्षेत्र मोठ्या प्रमाणात वाढले. त्यामुळे आता ऊस मोठ्या प्रमाणात शिल्लक राहण्याची भिती निर्माण झालेली आहे. राज्य साखर संघानं तर शिल्लक उसाच्या वाहतुकीसाठी कारखान्यांना टनानुसार अनुदान न हेक्टरी शेतकऱ्यांना ५० हजाराची मदत करण्याची मागणी केली. सभासदांचा ऊस शिल्लक राहिला तर त्या कारखान्यानेच शिल्लक उसाची भरपाई देण्यात यावी. उसाला प्रतिटन २३०० रूपये भाव धरल्यास एकरी ३० टन उतारा गृहीत धरून ६९ हजार रूपये होतात. मग शेतकऱ्याला एवढा मोठा आर्थिक भुर्दंड कशासाठी? तिथ त्यानं हेक्टरी २५ हजार रूपये का घ्यावेत. मुळातच तीन यंत्रणेच्या लक्षात हे येत नाही.


## श्री भरत अर्बन को-ऑफ बँक लि., जयसिंगपूर

ता. शिरोळ, जि. कोल्हापूर फोन : २२५४३०, २२५७२२ २२९९२३ फॅक्स नं. : ०२३२२ २२५७२३

■ २८ हजारांवर सभासद ■ संस्थापक, संचालक व्यवस्थापन ■ सर्व शाखा कार्यालये स्वत:चे इमारतीत ■ अद्यावत कॉम्प्युटर सेवा ■ सर्व शाखांकडे लॉकर्सची सोय ■ लाखापर्यंतच्या ठेवीस विमा संरक्षण देशातील प्रमुख ४८८ शहरांवरील डी.डी.ची अल्प कमिशनमध्ये सोय ■ बँक सतत नफ्यात ■ ज्येष्ठ नागरिकांसाठी ठेवीवर १/२ टक्के जादा व्याज ■ १० ग्रॅम चोख सोन्यास रु. १४००० कर्ज १० टक्के व्याजदराने

| ठेवी | कर्जे | ऑडिट वर्ग | | स्वभांडवल | गुंतवणूक | एन.पी.ए. |
|---|---|---|---|---|---|---|
| ४१४७.९५ | २१७८.७१ | ---- | नफ्यात | ४५५.१५ | २१८९.४३ | ३.३७ टक्के |

**श्री. व्ही. बी. हुग्गे.**
बी. ए. बी. कॉम.
चिफ एक्झि ऑफिसर

**श्री. अशोक शां रूणवाळ.**
बी. कॉम
व्हा. चेअरमन
व सर्व संचालक

**पै. विठ्ठल बाबूराव मोरे**
एम. ए.
चेअरमन

# १० वर्षापासून अन्नाशिवाय; तरीही ठणठणीत

जालनाः तब्बल १० वर्षे अन्न ग्रहण करण्याशिवाय जगणारा एक माणूस आहे. जगतो तो केवळ मूग भिजवून ठेवलेल्या पाण्यावर विशेष म्हणजे त्यांची प्रकृती तुमच्या आमच्यापेक्षा ठणठणीत आहे विज्ञान आणि वैद्यकीय क्षेत्राला आव्हान वाटेल, अशा या व्यक्तीचे नाव आहे अभय देवडा.

सध्याही देवडा हे तंदुरस्त असून बँक ऑफ बडोदा येथे नियमित कामकाज करीत आहेत. त्यांना ४ - ५ तासांची झोप पुरेशी ठरते. बाकी १९ ते २० तास ते काम करू शकतात. त्यांनी २१ सप्टेंबर २००१ पासून अन्नत्याग केलेला आहे. चार दिवसातून एकदा शौचाला जातात. या काळात ते पाणीही घेतलेले नाहीत. रोज ५ ग्रॅम मूग २०० मिली पाण्यात भिजवून ठेवतात. त्यानंतर ते पाणी गाळून पाणी पितात. आतापर्यंत त्यांनी ११ वेळा रक्तदानही केलेले आहे. देवडा यांच्या प्रकृतीविषयी डॉ. राजेश सेठीया यांनी सांगितले, की देवडा यांची तब्येत ठणठणीत आहे. त्यांचे सध्याचे वय ४५ वर्षे आहे. नियमित योगासन, प्राणायम आणि ध्यान साधना करतात. तसेच त्यांनी एका मुलीला दत्तक घेतलेले आहे. त्या मुलीचे त्यांनी लग्नही लावून दिलेले आहे. याबाबत देवडा म्हणाले, कधीही आणि कोठेही कोणत्याही चाचणीला सामोरे जाण्याची तयारी आहे. वारंवार हे आव्हान स्वीकारून यशस्वी झालो आहोत. तसेच १० वर्षे आपण डॉक्टरांच्या निगरणाखाली आहोत, असा दावा त्यांनी केला.




**माझ्या ऑफिसमधल्या हेरगिरी प्रकरणामुळे मी चिडलो नाहीये! पण या हेरगिरीतून मी काहीच काम करीत नाही हे सिद्ध होते, याचा मला जास्त राग आलाय!!**




# उसाच्या पाचटापासून सेंद्रिय खत बनवा

बहुतेक शेतकरी शेतामध्ये सेंद्रिय खताचा वापर न करता पिकामागून पीक घेत असल्यामुळे जमिनीचा कस कमी होत आहे. आणि उत्पादनात घट आल्याचे दिसून येते. म्हणून उसाच्या जोमदार वाढीसाठी आणि यापासून अधिक उत्पन घेण्यासाठी सेंद्रिय खताचा वापर करणे जरूरीचे आहे. जमिनीत पोत सुधारावयाचे असल्यास आणि जमिनीतील उपलब्ध अन्नद्रव्य वाढवायचे असेल तर सेंद्रिय खताचा वापर करणे आवश्यक आहे. जमिनीमध्ये असंख्य प्रकारच्या सूक्ष्म जीवाणू, विषाणू, सूक्ष्म कृमी, इ. जीवाणू असतात. बुरशीजन्य जीवाणू आणि सूक्ष्म जीवाणू सेंद्रिय पदार्थाचे सतत विघटन करीत असतात. त्यामुळे जमिनीत सेंद्रिय साठा न होता ते अव्याहतपणे रूपांतरीत होत राहतो. तसेच जमिनीत राहिलेल्या मुळाचेही या जीवाणूमुळे विघटन होत असते. याक्रियामुळे सेंद्रिय पदार्थाचा सूक्ष्म कणात रूपांतर होते. आणि ऊस पिकाच्या वाढीसाठी लागणाऱ्या अन्नद्रव्याचा साठा वाढवून जमिन सुपिक बनत जाते. भारतात तसेच महाराष्ट्रात ऊस पीक मुख्यत्वे करून साखर आणि गूळ करण्यासाठी घेतले जाते. ऊस तोडणी नंतर उसाचे पाचट जमिनीत राहते. बहुतेक शेतकरी हे पाचट सर्रास जाळून टाकतात आणि त्यामुळे मौल्यवान सेंद्रिय पदार्थाचा नाश होतो. पाचट एका ठिकाणी मोठ्या प्रमाणात उपलब्ध करून त्याचे खत बनवायचा प्रयत्न शेतकरी करीत नाहीत. प्रती हेक्टरी पाचट ८ ते १० टन मिळते. व त्यापासून कंपोस्ट खत तयार केले असता ४ ते ५ टन एवढे खत मिळू शकते. मात्र ते जाळल्यामुळे वाया जाते.

शेतीसाठी उसापासून मिळणाऱ्या पाचटाचाा दोन प्रकारे उपयोग करून घेता येईल. १) मशिनच्या सहाय्याने पाचटाचे लहान तुकडे करून ते जमिनीत गाडले असता खत म्हणून उपयोग होतो. या करीता तोडणी झाल्याबरोबर पाचटाचे तुकडे करून जमिनीत गाडावे आणि त्यानंतर लगेच पाणी द्यावे. पाणी दिल्यामुळे पाचटाची कुजण्याची प्रक्रिया लवकर सुरू होते.

**पाचट जमिनीत गाडल्यामुळे होणारे फायदे** -



१: पाचट गाडल्यामुळे जमिनीची ओल धरून ठेवण्याची क्षमता वाढते.

२: जमिनीचा पोत सुधारतो.

३: या सेंद्रिय खतामुळे उसाच्या उत्पादनात वाढ होऊन खर्चात बचत होते.

४: जमिनीमध्ये विघटनाची क्रिया होत असल्याने निर्माण होणारा कार्बन - डायऑक्साईड व इतर अन्नद्रव्ये पिकांना उपलब्ध करून देण्यास मदत होते.

५) पाचट जमिनीत गाडल्यामुळे जमिनीच्या भौतिक, रासायनिक व जैविक गुणधर्माची सुधारणा होते.

२) दुसऱ्या प्रकारात पाचटापासून उत्तम प्रतिचे सेंद्रिय खत तयार करण्यात येते. लवकर कुजण्यासाठी बुरशीजन्य जीवाणू वापरावेत. कंपोस्ट खत पाचटापासून तयार करण्याची पध्दत खाली दिली आहे. सेंद्रिय पदार्थाचे विघटन वाढीसाठी पाण्याची आवश्यकता असते. हे प्रमाण पाचटाच्या किंवा सेंद्रिय पदार्थाच्या ६० ते ७० टक्के असणे जरूरीचे आहे.

कंपोस्ट खड्डा भरण्यासाठी पाचटाचे लहान तुकडे करावेत. शक्य झाल्यास मशीनच्या सहाय्याने पाचडाचे लहान तुकडे करावेत. म्हणजे खत लवकर कुजते. पाचटामध्ये कर्बाचे प्रमाण इतर प्रकारच्या काडापेक्षा खूपच जास्त असते तसेच नत्राचे प्रमाण कमी असते. त्यामुळे पाचट कुजण्यास वेळ लागतो म्हणून ८ किलो युरीया प्रतिटन पाचटाला वापर केला असता. कर्ब नत्राचे प्रमाण ६०:१ इतके खाली येऊन खत लवकर तयार होण्यास मदत होते. तसेच सुपर फॉस्फेट १० किलो. प्रति टनास वापरल्यामुळे जीवणूची वाढ होते व कुजण्याची क्रिया लवकर होते.

पाचट जलद कुजण्यासाठी जीवाणूचा वापर करावा. पाचटाच्या दर टनास १/२ किलो प्रमाणे सूक्ष्म जीवाणू १० टक्के शेणखतात मिसळून कंपोस्ट खड्डा भरताना शिंपडावे. खड्डा एक मिटर, दोन मिटर रूंद व लांबी ४ ते ५ मिटर ठेवावी, खड्डा भरताना तळाशी २० सेमी बारीक पाचटाचा जीवाणू शेण द्रावणाचा पातळ थर द्यावा. त्यावर पाचटाचा थर देऊन पुन्हा रासायनिक खत द्रावण व शेणखत जीवाणू द्रावण प्रत्येक थरात शिंपडावे अशा तऱ्हेने खड्डा भरावा आणि तो मातीच्या सहाय्याने झाकून टाकावा. एक ते २ महिन्याची खड्ड्यातील पाचट खालीवर करावे. असे केल्याने पाचटापासून ३ - ४ महिन्यात उत्तम कंपोस्ट खत तयार होते. उसाच्या पाचटापासून केलेल्या कंपोस्ट खत इतर सेंद्रिय खतापेक्षा चांगलेच असते. तरी शेतकऱ्यांनी उसाचे पाचट न जाळता त्याचा वरीलप्रमाणे सेंद्रिय खत तयार करून जमिनीचा पोत सुधारून उसाचे उत्पादन वाढवावे हे काळची गरज आहे.

# मीडीया किती बिघडला हे बातम्यांच्या पेरणीतून दिसले: पत्रकार लाईनमन झाले

**पुणे**: मृगाने अजून म्हणावी तसी बहर केलेली नाही. कुठे तो बरसला, कुठे अजून ढगांकडेच महाराष्ट्र बघतो आहे. त्यामुळे म्हणाव्या तशा पेरण्या झालेल्या नाहीत. बातम्यांच्या पेरण्या मात्र याच काळात भरपूर झाल्या आणि त्यांचे पीकही जोरात होते. गोपीनाथ मुंढे विरूध्द नितीन गडकरी या संघर्षात आजचा मीडिया किती बिघडला हे बातम्यांच्या पेरणीतून दिसले. पत्रकारितेच्या पूर्वजांनी असे काही पेरले नव्हते, तरी पेरलेल्या बातम्यांचे पीक उगवले.

मुंडे यांचे बंड, मुंडे काँग्रेसच्या वाटेवर, मुंडे केंद्रात मंत्री होणार, मुंडे शिवसेनेत जाणार, मुंडे मुलीच्या मतदारसंघातून पुन्हा विधानसभेवर जाण्याच्या तयारीत, तसा प्रस्ताव त्यांनी भाजपश्रेष्ठांना दिला. टीव्हीवरच्या मालिकांचे लांबत जाणापे शेपूट थिटे पडावे असा कल्पनाविलास रंगवणाऱ्या या बातम्यांचे पेरते कोण होते? संपूर्ण मुंडे - गडकरी प्रकरणात शेवटपर्यंत सत्य हाती बाहेर आले नाही. कुठल्याच बातमीत कुणाचे साधे अवतरण किंवा कोट पत्रकारांना मिळू नये. ते बातमीत लिहतोय, सुत्रांचे बोट धरून ठोकून देतोय त्यावर लोकांनी विश्वास ठेवायचा तो कशाच्या आधारे? हा साधा प्रश्नही पत्रकारांनी स्वतःला विचारला नाही. आधार म्हणून दुजोरा किंवा इन्कार वरिष्ठ नेत्यांकडून मिळू नये इतकी मीडियाची पत गेली आहे.

चांदोबाच्या गोष्टी सांगाव्यात तशा मुंडेच्या कहाण्या पत्रकारांनी रचल्या. काँग्रेस अध्यक्षा सोनिया गांधी यांचे राजकीय सल्लागार अहमद पटेल यांची मुंडे न घेतलेली भेट पत्रकारांनी घडवून आणली. नंतर मुंडेनीच खुलासा केला की, मी पटेलना आयुष्यात कधीही भेटलेलो नाही. काँग्रेसला न विचारता मनमोहन सिंग सरकारची मंत्रिपदे वाटण्याच अधिकार कुणी दिला. पळा पळा कोण पुढे पळे तो अशा स्पर्धेपुरतेच ही बातमीदारी नसावी. तरीही बातम्यांची पेरणी सुरूच राहिली. पावसाळा आला की, पेरते व्हा, अशी शीळ घालणारा पावशा पक्षी अवतरतो. पत्रकारांना पेरते व्हा, ची घालणारे पक्षी नव्हे, तर पक्ष होते. एका पक्षातले अनेक पक्षी होते.

गुन्हेगार - राजकारणी - पोलीस असे नेक्सस असल्याचे आपण सांगत असतो. मुंडे प्रकरणात तर पत्रकारांचे देखील एकाच पक्षातल्या निरनिराळ्या गटांशी असेच नेक्सस असावे. तशी शंका यावी अशीच बातम्यांती पेरणी होती. पत्रकार व्यवस्थीत वापरले गेले. कोणी गडकरींची लाईन चालविली. कोणी मुंडेची चालविली. कोणी एकनाथ खडसे आणि सुधीर मुनगंटीवार यांची तळी उचलली. असे लाईनमन होताना पत्रकार म्हणून आपली इभ्रत गमावत आहोत, याचे भान पत्रकारांना राहिले नाही. भाजपाचे ज्येष्ठ नेते लालकृष्ण अडवाणी यांच्या निवासस्थानी रात्री उशिरापर्यंत बैठक चालली. बैठकीला मुंडे आणि गडकरी होते. मनगुंठीवार होते. बैठकीला नेमकी चर्चा यातल्या कुणीच आपल्या लाईनच्या पत्रकारांना आपल्या सोयीच्या लाईननुसारदेखील दिलेली नाही. बैठक संपेपर्यत पत्रकार अडवाणींच्या घराबाहेर बसून होते. नेत्यांच्या दारात किंवा माजघरात बसल्याने बातमी कळत नाही. ती मिळवण्यामागे मार्ग असतात. पण बातम्या पेरण्याच्या नादात साधे कौशल्यही पत्रकार विसरले. वृतपत्रांची वाचक संख्या वाढत आहे. दरवर्षी आकडे येतात आणि या आकड्याचे दावे लहान - मोठे केले जातात. आताही ते झळकले. वृत्तवाहिन्याही जोरात आहेत. त्यांचाही प्रेक्षकवर्गही वाढतो आहे. तो आणखी वाढावा म्हणून ब्रेकिंग न्यूजची स्पर्धा आहे. यात गुणवत्तेचे काय? मुंडा बिगडा जाय, अशी मुंडे प्रकरणावरील मस्त कोटी मिडिया बिगडा जाय... अशी आपणच सिध्द केली.......!

# राष्ट्रीय स्वास्थ विमा योजनेत
# कोट्यवधींचा घोटाळा

**नागपूरः** बीपीएल यादीक्त नसलेल्या व्यक्तीचा ३० हजार रूपयांचा विमा काढण्यासाठी बोगस स्मार्ट कार्ड बनविण्यात येत आहे. राज्यात आतापर्यंत १६ लाख ८९ हजार ३८६ बीपीएल कुटुंबाचा विमा उतरविण्यात आला असून त्यापैकी मोठ्या प्रमाणात बोगस स्मार्ट कार्ड असण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. या बोगस कार्डच्या आधारे शासनाचे कोट्यवधी रूपये लुबाडण्यात आलेले आहेत.

केंद्र सरकारने राष्ट्रीय स्वास्थ विमा योजना राष्ट्रीयकृत व खासगी विमा कंपन्यांच्या सहकार्याने सुरू केली असून त्यामध्ये दारिद्रयरेषेखालील कुटुंबांना ३० हजार रूपयेपर्यंत आरोग्य विमा दिला जातो. राज्यामध्ये आयसीआयसीआय लोम्बार्ड, चोलामंडलम्, दि न्यू इंडिया इन्शुरन्स कंपनी आदी कंपन्यांच्या माध्यमातून ३१ जिल्ह्यांमध्ये ही योजना ३९ लाख ८४ हजार ४६६ बीपीएल कुटुंबासाठी राबविण्यात येत आहे. गत दोन वर्षांमध्ये बोगस स्मार्ट कार्ड तयार करून ही योजना पोखरण्यात येत आहे.

विमा कंपनीचे प्रतिनिधी गावांमध्ये गेल्यावर बीपीएल यादीत नाव नसलेल्या लोकांचेही छायाचित्र काढून बोगस स्मार्ट तयार करीत आहेत. एका स्मार्ट कार्डवर केंद्र सरकारकडून विमा कंपनीला ७५० रूपये दिले जातात. गत दोन वर्षामध्ये शासनाने महाराष्ट्रात १२६ कोटी ७० लाख ३९ हजार ५०० रूपये विमा कंपन्यांना दिले जा-तात. दोन स्मार्ट कार्डची तपासणी आयसीआयसीआय लोम्बार्ड कंपनीच्या माहिती संकलन केंद्रावर केली असता ते दोन्ही कार्ड बोगस असल्याचे दिसून आले. महाराष्ट्रातील ३१स जिल्ह्यांपैकी १/६ जिल्ह्यांचे काम आयसीआयसीआय लोम्बार्ड या खासगी विमा कंपनीला मिळाले आहे. बोगस कार्डाविरोधात आक्रमणचे अध्यक्ष ॲड. सुनील गजभिये व सुधाकर डोंगरे यांनी कामगार आयुक्तांकडे तक्रार केली असून शासकीय योजनेचा बोजवारा उडविल्याने चौकशी करण्याची मागणी केली आहे.



**महाराष्ट्रात कमी दाबाचा पट्टा निर्माण झाल्याने अचानक मोठ्या वादळाची शक्यता होती. पण उत्तरेकडील वाऱ्यांचा वेग घटल्याने वादळ शमले! नेमकं काय वाचताय? मान्सूनचं वार्तापत्र की मुंडेंची बातमी!**



**तुमचं म्हणणं शांतपणे ऐकून घेतल्यावर आम्ही आता असं ठरवलंय की, तुमचं म्हणणं शांतपणे ऐकून घ्यायचं!!**



**कोल्हापूर : इचलकरंजीच्या पंचगंगा कारखान्याला ऊसपुरवठा केलेल्या शेतकऱ्यांची बिले देण्यासाठी कारखान्याची साखर जप्त करून संचालकांवर गुन्हे दाखल करावेत, या मागणीचे निवेदन डी. एस. कटरे यांना देताना 'स्वाभिमानी'चे भगवान काटे, उल्हास पाटील व इतर.**

# साखर जप्त करून ऊस बिले द्या

## 'स्वाभिमानी'चे साखर उपसंचालकांना 'पंचगंगा'बाबत निवेदन

कोल्हापूर : इचलकरंजी येथील पंचगंगा साखर कारखान्याला ऊसपुरवठा केलेल्या शेतकऱ्यांना कारखान्याची साखर जप्त करून पैसे द्यावेत, कारखान्याच्या संचालकांवर बिल न दिल्याबद्दल फौजदारी दाखल करावी, या मागण्यांचे निवेदन स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या वतीने प्रादेशिक साखर उपसंचालक डी. एस. कटरे यांना देण्यात आले.

पंचगंगा कारखान्याला यावर्षीच्या हंगामात ऊसपुरवठा केलेल्या शेतकऱ्यांना मार्चपासून उसाचे बिल मिळालेले नाही. या काळात सुमारे दीड लाख टन ऊस गाळप झाला आहे. कारखान्याने पहिल्या हप्त्यापोटी १९०० रुपये जाहीर केले आहे. ऊस गळीत झाल्यापासून १४ दिवसांच्या आत बिल देणे कारखान्यांना कायद्याने बंधनकारक आहे; मात्र 'पंचगंगा' कडून गेली तीन महिने पहिला हप्ता दिलेला नाही. परिणामी, ऊस उत्पादक शेतकरी हवालदिल झाले आहेत. शेतकऱ्यांची बिले देण्यासाठी कारखान्याची साखर जप्त करावी व संचालकांवर गुन्हे दाखल करावेत; अन्यथा संघटनेच्या वतीने तीव्र आंदोलनाचा करण्याचा इशारा निवेदनात देण्यात आला.

निवेदन देण्यासाठी गेलेल्या शिष्टमंडळात संघटनेचे जिल्हाध्यक्ष भगवान काटे, उल्हास पाटील, आदिनाथ हेमगिरे, अरुण मगदूम, रामचंद्र फुलारे, सागर शंभूशेटे आदींचा समावेश आहे.



**उपोषण हेच आमचं प्रमुख शस्त्र असलं तरी या शस्त्रावर विश्वास न ठेवणारी नवी सशस्त्र सेना आम्ही तयार करणार आहोत!!**



**कोल्हापूर : इचलकरंजीच्या पंचगंगा कारखान्याला ऊसपुरवठा केलेल्या शेतकऱ्यांची बिले देण्यासाठी कारखान्याची साखर जप्त करून संचालकांवर गुन्हे दाखल करावेत, या मागणीचे निवेदन डी. एस. कटरे यांना देताना 'स्वाभिमानी'चे भगवान काटे, उल्हास पाटील व इतर.**

# साखर जप्त करून ऊस बिले द्या

## 'स्वाभिमानी'चे साखर उपसंचालकांना 'पंचगंगा'बाबत निवेदन

कोल्हापूर : इचलकरंजी येथील पंचगंगा साखर कारखान्याला ऊसपुरवठा केलेल्या शेतकऱ्यांना कारखान्याची साखर जप्त करून पैसे द्यावेत, कारखान्याच्या संचालकांवर बिल न दिल्याबद्दल फौजदारी दाखल करावी, या मागण्यांचे निवेदन स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या वतीने प्रादेशिक साखर उपसंचालक डी. एस. कटरे यांना देण्यात आले.

पंचगंगा कारखान्याला यावर्षीच्या हंगामात ऊसपुरवठा केलेल्या शेतकऱ्यांना मार्चपासून उसाचे बिल मिळालेले नाही. या काळात सुमारे दीड लाख टन ऊस गाळप झाला आहे. कारखान्याने पहिल्या हप्त्यापोटी १९०० रुपये जाहीर केले आहे. ऊस गळीत झाल्यापासून १४ दिवसांच्या आत बिल देणे कारखान्यांना कायद्याने बंधनकारक आहे; मात्र 'पंचगंगा' कडून गेली तीन महिने पहिला हप्ता दिलेला नाही. परिणामी, ऊस उत्पादक शेतकरी हवालदिल झाले आहेत. शेतकऱ्यांची बिले देण्यासाठी कारखान्याची साखर जप्त करावी व संचालकांवर गुन्हे दाखल करावेत; अन्यथा संघटनेच्या वतीने तीव्र आंदोलनाचा करण्याचा इशारा निवेदनात देण्यात आला.

निवेदन देण्यासाठी गेलेल्या शिष्टमंडळात संघटनेचे जिल्हाध्यक्ष भगवान काटे, उल्हास पाटील, आदिनाथ हेमगिरे, अरुण मगदूम, रामचंद्र फुलारे, सागर शंभूशेटे आदींचा समावेश आहे.



**उपोषण हेच आमचं प्रमुख शस्त्र असलं तरी या शस्त्रावर विश्वास न ठेवणारी नवी सशस्त्र सेना आम्ही तयार करणार आहोत!!**



# यंत्रमागधारकांच्या समस्यांवर लवकरच तोडगा : मुखर्जी

नवी दिल्ली(प्रतिनिधी): विकेंद्रीत क्षेत्रातील यंत्रमागधारकांच्या समस्यांचा विचार करून त्या सोडविण्यासाठी वस्त्रोद्योग मंत्रालयाच्या वतीने एक धोरण आखून सर्वसमावेशक उपाययोजना करण्यात येतील, असे आश्वासन केंद्रीय वित्तमंत्री ना. प्रणव मुखर्जी यांनी दिले. खासदार राजू शेट्टी यांच्या मार्गदर्शनाखाली यंत्रमागधारकांचे शिष्टमंडळ नवी दिल्ली येथील अर्थमंत्रालयात ना. मुखर्जी यांनी भेटले. यंत्रमागधारकांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर ना. मुखर्जी यांनी सदर आश्वासन दिले.

यंत्रमागधारकांच्या समस्या समजावून घेऊन मार्ग काढण्यासाठी ना. प्रणव मुखर्जी यांनी वेळ द्यावी, अशी मागणी काही दिवसापूर्वी खासदार राजू शेट्टी यांनी केलेली होती. त्यानुसार प्रणव मुखर्जी यांनी खासदार राजू शेट्टी यांना चर्चेला बोलावले होते. यावेळी इचलकरंजी पॉपरलूम असोशिएशनचे अध्यक्ष सतिश कोष्टी, उपाध्यक्ष दत्तात्रय कनोजे, नाफाचे सरचिटणीस अनिल सिंग आदींनी ना. मुखर्जी यांची भेट घेतली. यंत्रमागधारांच्या समस्या मांडणारे निवेदन इचलकरंजी पॉवरलूम असोशिएशनचे अध्यक्ष सतिश कोष्टी व उपाध्यक्ष दत्तात्रय कनोजे यांनी ना. प्रणव मुखर्जी यांना दिले. वस्त्रोद्योग व्यवसायात सध्या अभूतपूर्व मंदी असल्याने यंत्रमागधारकांचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान झालेले आहे. त्यांना या परिस्थितीत दिलास देण्यासाठी कर्जावरील व्याजात सवलत मिळावी, टफस् योजनेप्रमाणे छोट्या यंत्रमागधारकांच्या मागात सुधारणा होण्यासाठी भरीव आर्थिक अनुदान द्यावे, यार्न बँकेसाठी ५ कोटी रूपयांची तरतूद करावी, शेती, पोल्ट्री याप्रमाणे यंत्रमाग व हातमागास अत्यल्प व्याजाचे कर्ज उपलब्ध व्हावे, विदेशातून मशिनगी आणताना त्यावर कस्टन ड्युटी आकारू नये, लघुउद्योग स्वरूपात गारमेंट उद्योग करणाऱ्यांना त्यांचा ब्रॅण्ड बाजारात स्थिरावण्यासाठी त्यांची एक्साईज ड्युटीची मर्यादा १.५ कोटीवरून १५ कोटीपर्यंत नेण्यात यावी. सुतावर छापील किंमत असावी, सूत व कापसाच्या वायदे बाजारावर नियंत्रण आणावे, आदी मागण्यांचे निवेदन त्यांना देण्यात आले. तसेच त्यावर प्रदीर्घ चर्चा करण्यात आली. चर्चेनंतर ना. प्रणव मुखर्जी म्हणाले, विकेंद्रीत क्षेत्रातील यंत्रमागधारकांना दिलासा देणारे नवे धोरण जाहीर करण्यात येईल. गारमेंट उद्योगसंदर्भात मांडलेल्या भूमिकेवर गंभीरपूर्वक विचार करून निर्णय घेण्यात येईल. बरेचसे विषय वस्त्रोद्योग मंत्रालय न अन्य दोन - तीन मंत्रालयाळी संबंधित असल्याने त्यांच्याशी चर्चा करून लवकरच उपाययोजना केली जाईल.



# शेतकऱ्यांचे प्रबोधन करीत चालली चिमुकल्यांची दिंडी

पुणे- जगाच्या अन्नदात्या शेतकरीराजा आत्महत्या करू नकोस...असा संदेस देत. भरपूर पाऊस पडू दे, शेतातली पिके चांगली येऊ दे..... असे साकडे पांडुरंगाला घालण्यासाठी नाशिक येथील आधारतीर्थ आधाराश्रमातील चिमुकल्यांची दिंडी चालली आहे.

गेल्या काही वर्षात महाराष्ट्रात शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणात आत्महत्या केल्या आहेत. त्यामुळे त्यांच्या मुलांवर निराधार होण्याची वेळ आली आहे. वारीतही अनेक वारकरी शेतकरीच असतात. या पार्श्वभूमीवर वारीच्या माध्यमातून हे चिमुकले शेतकऱ्यांचे प्रबोधन करीत आहेत. या दिंडीत ४० मुली आणि ६० मुले असे एकूण १०० जण आहेत. पाच वर्षे वयापासून १६ वर्षापर्यंतची मुले दिंडीत सहभागी झालेले आहेत. मनीषा चौधरी ही नववीतील मुलगी म्हणाली, निराधार होण्याची वेळ इतरांवर येऊ नये, यासाठी आत्महत्यांचे प्रकार बंद व्हावेत. असा संदेश आम्ही वारीतून देणार आहोत. मला शिकून डॉक्टर व्हायचे आहे. लोकांची सेवा करायचे आहे. तर दुसरीत शिकणारा समाधान म्हणाला, खूप पाऊस पडू दे, सर्वांबरोबर सुखी होऊ दे, अशी प्रार्थना पांडुरंगाच्या चरणी करण्यासाठी आम्ही पंढरीला चाललो आहोत.

याविषयी आधारतिर्थ आधाराश्रमाचे विश्वस्त त्र्यंबक गायकवाड म्हणाले, महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबाव्यात व कोणावरही निराधार होण्याची वेळ येऊ नये, यासाठी या दिंडीतून प्रबोधन करण्याचे काम आम्ही करत आहोत. भविष्यात या मुलांचे जीवनमान सुधारून त्यांनी चांगले नागरिक बनावे, यासाठी आम्ही हा प्रयत्व करीत आहोत.



# मलकापुरात कृषी अधिकारी, खत विक्रेते धारेवर

## जादा दराने खत विक्री : स्वाभिमानींच्या पदाधिकाऱ्यांनी विचारला बैठकीत जाब

मलकापूर, ता. १४ : छापील किमतीपेक्षा जादा दराने खत विक्री होत असल्याचे निदर्शनास आल्याने स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या तालुक्यातील पदाधिकाऱ्यांनी तालुका कृषी अधिकारी व पंचायत समितीच्या कृषी अधिकाऱ्यांसह खत विक्रेत्यांची बैठक घेऊन त्यांना धारेवर धरत जाब विचारला. त्यावेळी कृषी अधिकाऱ्यांसह खत विक्रेतेही निरूत्तर झाले.

तालुक्यात जादा दराने खत विक्री होत असल्याच्या तक्रारी शेतकऱ्यांनी स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांच्याकडे केल्या. त्यानुसार संघटनेचे तालुका अध्यक्ष वसंत पाटील व मलकापूर शहर अध्यक्ष भरतेश कळंगे यांच्यासह पदाधिकाऱ्यांनी थेट मलकापूर, बांबवडे बाजारपेठांत जाऊन खत विक्रेत्यांच्या दुकानांवर चौकशी केल्या. त्यावेळी काही विक्रेते जादा दराने खत विक्री करत असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. त्यावेळी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी कृषी अधिकाऱ्यांशी दूरध्वनीवरून संपर्क साधून माहिती दिली. मात्र, संबंधित अधिकारी त्या ठिकाणी पोहचू शकले नाहीत. त्यामुळे संतप्त झालेल्या पदाधिकाऱ्यांनी थेट खासदार राजू शेट्टी यांच्याशी संपर्क साधून घडल्या प्रकाराची माहिती दिली.

त्यानंतर यंत्रणा गतिमान झाली. पंचायत समितीत कृषी अधिकारी, खत विक्रेते व संघटनेचे पदाधिकारी यांची बैठक झाली. त्यावेळी छापील किमतीपेक्षा जादा दर का? आदी बुकिंग का? यावर कोणती कारवाई केली, असे प्रश्न भरतेश कळंत्रे यांनी विचारले. तर खत टंचाईच्या नावाखाली जादा दर घेऊन शेतकऱ्यांची लुबाडणूक थांबवा, अशी मागणी तालुका अध्यक्ष वसंत पाटील यांनी केली. जादा दराने खत विक्री होत असल्याचे त्यांनी प्रत्यक्ष उघड केले. त्यावेळी कृषी अधिकारी व खत विक्रेतेही निक्षत्तर झाले.

यावेळी तालुका कृषी अधिकारी श्री. इंगवले व पंचायत समिती कृषी अधिकारी डी. पी. महाले म्हणाले, ''छापील किमतीपेक्षा जादा दराने खत विक्री कोणालाही करता येणार नाही. तसे आढळल्यास आम्ही कारवाई करू. तालुक्यात सर्वच प्रकारच्या खतांचा तुटवडा आहे. जिल्हा कार्यालयाशी संपर्क साधून जादा खत पुरवठ्यासाठी आम्ही प्रयत्नशील राहू.''

स्वाभिमानीच्या कार्यकार्यांनी यावेळी खासदार राजू शेट्टी यांच्याशी दूरध्वनीवरून संपर्क साधून तालुक्यातील खत तुटवड्याबद्दल माहिती दिली. त्यावेळी आपण जिल्हाधिकाऱ्यांशी बोलून जादा खत पुरवठ्यासाठी प्रयत्न करत असल्याचे त्यांनी सांगितले.

बैठकीस स्वाभिमानी संघटनेचे तालुका अध्यक्ष वसंत पाटील, मलकापूर शहर अध्यक्ष भरतेश कळंत्रे, अमल महाजन, बाळासाहेब पाटील, दीपक पाटील, तालुका कृषी अधिकारी श्री. इंगवले, पंचायत समिती कृषी अधिकारी डी. पी. महाले, तालुक्यातील खत वितरक व संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते.

# 'स्वाभिमानी'तर्फे साखर वाहतूक रोको सुरू

हुपरी : गत हंगामातील उसास प्रतिटन २७०० रुपये अंतिम दर मिळाला पाहिजे, या मागणीसाठी स्वाभिमानी शेतकरी संघटनेने साखर कारखान्यांची साखर तसेच उपपदार्थांची वाहतूक रोखण्याच्या आंदोलनास आजपासून सुरवात केली.

दरम्यान, संघटनेचे जिल्हाध्यक्ष भगवानराव काटे यांनी कारखान्यांकडून साखरेची वाहतूक करण्याचा प्रयत्न झाल्यास वाहने फोडण्याचा इशारा येथे झालेल्या सभेत दिला.

२००९-१० या हंगामात गळितास गेलेल्या उसास प्रतिटन २७०० रुपये दर मिळावा, या मागणीसाठी स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या वतीने ७ जूनला हातकणंगले, शिरोळ तालुक्यांतील साखर कारखान्यांवर मोटारसायकल फेरी काढण्यात आली होती.

कारखान्यांना निवेदन देण्यात येऊन मागणीची पूर्तता न झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा खासदार राजू शेट्टी यांनी दिला होता. या मागणीबाबत कारखान्यांकडून कोणतीच कार्यवाही न झाल्यामुळे अखेरीस आजपासून साखर कारखान्यांकडून होणारी साखर तसेच उपपदार्थांची वाहतूक रोखण्यास संघटनेच्या कार्यकर्त्यांनी सुरवात केली.

त्यानुसार सकाळी येथील जवाहर सहकारी साखर कारखान्यावर संघटनेने मोर्चा काढला. या वेळी झालेल्या सभेत जिल्हाध्यक्ष भगवानराव काटे यांनी गत हंगामातील उसास २७०० रुपये दर देणाऱ्या कारखान्यांचे अभिनंदन करून दर न देणाऱ्या कारखान्यांचा निषेध केला.

# खतटंचाई, लिंकिंग रोखण्यास छापे

जयसिंगपूर : खतांची कृत्रिम टंचाई आणि लिंकिंग रोखण्यासाठी कृषी विभागाने धडक मोहीम सुरू केली आहे. या विभागाच्या भरारी पथकांनी आज माधवनगर आणि कडेगाव येथे छापे टाकून दोन कोटी रुपये किमतीच्या खत विक्रीस मनाई केली आहे. जिल्ह्यातील चार दुकानांचे परवाने निलंबित करण्यात आले आहेत. त्यामुळे खतविक्रेते हादरले आहेत.

जिल्ह्यात खताची कृत्रिम टंचाई केली जाते. लिंकिंगही सुरू असल्याच्या तक्रारी होत्या. शेतकऱ्यांनी केलेल्या तक्रारींची दखल घेऊन कृषी विभागाने रोखण्यासाठी भरारी पथके नियुक्त केली आहेत. जिल्ह्यात धडक मोहीम हाती घेण्यात आली आहे. जिल्हा परिषदेचे कृषी अधिकारी बसवराज मास्तोळी यांच्या नेतृत्वाखाली विशेष पथके नियुक्त करण्यात आली आहेत. त्यांनी खत विक्रीचे दुकाने आणि गोदामांची तपासणी सुरू केली आहे.

मोहीम अधिकारी प्रकाश कुंभार, विश्वनाथ खंबाळकर, गुणनियंत्रण निरीक्षक सर्जेराव अमृतसागर यांच्या नेतृत्वाखालील पथकाने आज माधवनगर येथे झुआरी कंपनीच्या रविवार पेठेतील गोदामावर छापा टाकला. तपासणीत लिंकिंग पद्धतीने खताची विक्री होत असल्याचे निदर्शनास आले. गोदामात १ कोटी ८५ लाख ३३ हजार रुपये किमतीचा २ लाख ५२ हजार २५० टन खतांचा साठा आढळला. या सर्व खतांची विक्री करण्यास मनाई करण्यात आली आहे. खत खरेदी करणाऱ्या शेतकऱ्यांची नोंद न करणे, अपुरे कर्मचारी आणि नियमानुसार अन्य नोंदणी न ठेवणे यासह अन्य त्रुटी आढळल्याने जिल्ह्यातील निमणी, कुंडल, निंबवडे येथील चार दुकाने निलंबित करण्यात आली आहेत.




सरकार म्हणून आपण आपली जबाबदारी ओळखली पाहिजे! जसं आपण लाखो बालकांच्या कुपोषणाकडे वर्षानुवर्षे दुर्लक्ष करतो तसंच काही उपोषणांकडेही करायचं!!



काय म्हणालीस? उपोषण आणि कुपोषण यात नेमका काय फरक आहे? उपोषण म्हणजे पत्रकार, कॅमेरे, मुलाखती, चॅनेल चर्चा, हेडलाईन्स वगैरे ...!



समडोळी (ता. मिरज) : सर्वोदय कारखाना बवाच कृती समितीच्या रविवारी झालेल्या बैठकीत संदीप राजोबा यांनी मार्गदर्शन केले.

# 'सर्वोदय' हडपण्याचा डाव उधळू : राजोबा

कर्नाळ : सर्वोदय सहकारी साखर कारखाना उभारताना सभासदांनी कर्ज काढून शेअर घेतले आहेत. राजारामबापू कारखान्याकडून एखादा करार करून हा कारखाना हडप करण्याचा डाव आखला जात असेल; तर तो खपवून घेतला जाणार नाही. हा कारखाना सभासदांच्या मालकीचा होता आणि तो त्यांच्याच मालकीचा राहील, असा निर्धार आज समडोळी (ता. मिरज) येथे आयोजित बैठकीत सभासदांनी केला.

सर्वोदय बचाव समितीने बैठक आयोजित केली होती. स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष संदीप राजोबा, दिलीप पाटील, राजाराम मिसाळ, अजित हराळे, रावसाहेब देसाई, एस. के. कोळी, आदिनाथ आडमुठे, मलगोंडा पाटील, मोहन लटपटे, बबन पाटील, श्रीधर मसुटगे, तात्यासाहेब कवठेकर आदी प्रमुख मंडळींच्या उपस्थितीत झालेल्या या बैठकीला सुमारे एक हजार लोक उपस्थित होते. 'सर्वोदय' वाचवायचाच, असा एल्गार या बैठकीत करण्यात आला.

'सर्वोदय' आणि 'राजारामबापू'त संघर्ष सुरू आहे. सर्वोदय कारखान्याशी झालेल्या कराराच्या आधारे त्यावर मालकी स्थापित करण्यासाठी 'राजारामबापू'च्या हालचाली सुरू आहेत. प्रकरण न्यायालयात गेले आहे. या पार्श्वभूमीवर सभासदांनी मोळी बांधली असून सर्वोदय बचाव कृती समितीची स्थापना केली आहे. त्याची पहिली बैठक आज झाली. त्यात श्री. राजोबा म्हणाले, ''सर्वोदय' आणि 'राजारामबापू'त झालेल्या कराराविषयी सभासदांना काहीही माहिती नाही. आम्हाला विश्वासात घेऊन तो करार झाला नव्हता. त्यामुळे तो सभासदांना लागू होत नाही. आम्ही पै-पै जमवून कारखान्याचे शेअर घेतले आहेत. त्यावर आमचा पहिला हक्क आहे. संचालक मंडळाने करार करताना चुकीची पद्धत अवलंबली. त्यांनी काय निस्तरायचे ते निस्तरावे. त्यात सभासदांचे नुकसान होता कामा नये. कृती समिती ते अजिबात खपवून घेणार नाही. प्रसंगी समितीतर्फे न्यायालयात धाव घेऊ.'' ते म्हणाले, ''आमचा कारखाना हडप केला जातोय, हे कुणीही सांगू शकेल. न्याय सत्याच्या बाजूनेच होतो, हे सर्वांनी ध्यानात ठेवावे. सभासदांची फसवणूक करून त्यांच्या मालमत्ता असलेला हा कारखाना कुणीही घशात घालण्याची स्वप्ने पाहू नयेत.'' आदिनाथ आडमुठे म्हणाले, ''इतरांना कायदेशीर सल्ला देणाऱ्या व्यंकप्पा पत्की यांनी हा घोळ घातला आहे. त्यांची चाणक्यनीती घरात ठेवावी, इथे चालणार नाही. करारात फसवणूक करून सभासदांचा घात करण्याचा त्यांचा इरादा असेल तर तो आम्ही उधळून लावू.''

दिलीप पाटील म्हणाले, ''सर्वोदय'च्या कर्मचाऱ्यांनी अतिशय कमी पगारात काम करून कारखाना उभा केला. त्यांच्या घामावर तो वाढला. गेल्यावर्षी पगारवाढ मागितली तेव्हा 'राजारामबापू'च्या नेत्यांनी आमच्याकडे हा कारखाना एकच वर्ष असल्याचे सांगितले. पगारवाढ पुढच्या वर्षी मागा, असा सल्ला दिला. उत्पन्न घेताना ते मालक होतात आणि देणे भागविताना संभाजी पवार का?'', असा सवाल त्यांनी केला.



**शिरोळ : चिंचवाड (ता. शिरोळ) ग्रामपंचायतीस तंटामुक्त अभियानात मिळालेल्या विशेष पुरस्काराची रक्कम खासदार राजू शेट्टी यांच्या हस्ते स्वीकारताना सरपंच विठ्ठल घाटगे. शेजारी जिल्हाधिकारी लक्ष्मीकांत देशमुख, प्रांताधिकारी तुषार ठोंबरे, तहसीलदार डॉ. संपत खिलारी आदी.**

# चिंचवाड ग्रामपंचायतीस तंटामुक्त विशेष पुरस्कार प्रदान

जयसिंगपूर : महाराष्ट्र शासनाचे महात्मा गांधी तंटामुक्त गाव अभियान यशस्वी केलेल्या चिंचवाड (ता. शिरोळ) येथील ग्रामपंचायतीस पाच लाख रुपयांचा विशेष पुरस्कार नुकताच शिरोळ येथे प्रदान करण्यात आला.

चिंचवाडचे सरपंच विठ्ठल घाटगेंसह तंटामुक्त कमिटीचे अध्यक्ष, सदस्य, तरुण मंडळांनी एकत्रित येऊन ग्रामस्थांच्या सहकार्याने गाव तंटामुक्ती अभियान प्रभावीपणे राबविले. याची दखल घेत ग्रामपंचायतीस शिरोळ पंचायत समितीच्या सभागृहात झालेल्या कार्यक्रमात आमदार सा. रे. पाटील यांच्या अध्यक्षतेखाली खासदार राजू शेट्टी यांच्या हस्ते, तसेच जिल्हाधिकारी लक्ष्मीकांत देशमुख, प्रांताधिकारी तुषार ठोंबरे, तहसीलदार डॉ. संपत खिलारी, पंचायत समिती सभापती सौ. भारती प्रभावळे, उपविभागीय पोलिस अधिकारी प्रकाश देशमुख, गटविकास अधिकारी एम. आर. जाधव यांच्या उपस्थितीत पाच लाख रुपयांचा धनादेश प्रदान करण्यात आला.

श्री. घाटगे म्हणाले, ''चिंचवाडमध्ये जुने वादग्रस्त पाच तंटे व नवीन आठ तंटे मिटविले. यामध्ये २०० पैकी १९३ गुण मिळवून ग्रामपंचायतीने विशेष पुरस्कार मिळविला आहे. याकामी उपसरपंच धन्यकुमार चौगुले, मुरली पाटोळे, रायाप्पा नाईक, कुमार माने, संजय नाईक, अण्णासाहेब दरबारे, सौ. सुनीता चौगुले, सुनीता गोधडे, सौ. मालूताई नाईक, सुनंदा कांबळे, सौ. कटारे, देशभूषण चौगुले, सर्जेराव घाटगे, बबन चव्हाण आदींचे सहकार्य लाभले.''



**जीवनावश्यक वस्तूंच्या किमती सतत वाढलेल्या पाहात राहणे खूपच त्रासदायक होत असल्याने मी हा उपाय योजलाय साहेब!!**



**गडहिंग्लज : ऊस दरासाठी स्वाभिमानी शेतकरी संघटनेतर्फे मोटारसायकल रॅली काढण्यात आली.**

# दर न दिल्यास साखर वाहतूक रोखू

## मोटारसायकल रॅलीने 'स्वाभिमानी'चा इशारा; गडहिंग्लज, आजरा कारखान्याला निवेदन

गडहिंग्लज : ऊस दरासाठी येथील स्वाभिमानी शेतकरी संघटनेने मोटारसायकल रॅलीद्वारे गडहिंग्लज आणि आजरा साखर कारखान्यावर धडक मारली. मागण्या तातडीने मान्य न झाल्यास साखर आणि उपपदार्थांची वाहतूक रोखण्याचा इशारा निवेदनाने दिला. राजेंद्र गड्यान्नावर यांच्या नेतृत्वाखाली रॅलीचे नियोजन करण्यात आले होते.

दुपारी एक वाजता येथील प्रांत कार्यालयापासून रॅली सुरू झाली. कार्यकर्त्यांच्या घोषणांत रॅलीने नागरिकांचे लक्ष वेधून घेतले. भडगाव, हुनगिनहाळमार्गे हरळी (ता. गडहिंग्लज) येथील अप्पासाहेब नलवडे गडहिंग्लज तालुका सहकारी साखर कारखान्यावर रॅली आली. याठिकाणी कारखान्याचे अध्यक्ष श्रीपतराव शिंदे यांना निवेदन देण्यात आले. दरासंदर्भात स्वाभिमानीचे अध्यक्ष, खासदार राजू शेट्टी यांच्या अध्यक्षतेखाली कारखान्यांच्या व्यवस्थापनाबरोबर जिल्हा बैठक झाली होती. त्यात २००९-१० मधील गाळप झालेल्या उसाचे अंतिम दर २७०० रुपये मिळावा, तर २०१०-११ मधील गाळप झालेल्या उसाचा दुसरा हप्ता प्रति टन २०० रुपये प्रमाणे मिळावा असे ठरले होते. गडहिंग्लज साखर कारखान्याने २००९-१० मधील उसाला प्रति टन २१६९ रुपये इतका दर दिला आहे. म्हणजेच कारखान्याकडून अद्याप प्रति टन ५३९ रुपये इतके अंतिम बिल येणे आहे. ही रक्कम शेतकऱ्यांना मिळावी आणि २०१०-११ मधील उसाचे २०० रुपये हप्ता येत्या पंधरा दिवसांत द्यावा, अन्यथा कारखान्याची साखर आणि उपपदार्थांची वाहतूक रोखण्याचा इशारा या निवेदनातून दिला आहे.

सुभाष पाटील, तानाजी देसाई, सखाराम केसरकर, अशोक पाटील, धनाजी पाटील, महादेव चौगुले, व्यंकटराव पाटील, प्रभाकर पाटील यांच्यासह कार्यकर्त्यांनी रॅलीत सहभाग घेतला. गडहिंग्लज कारखान्यानंतर गवसे (ता. आजरा) येथील आजरा सहकारी साखर कारखान्यालाही निवेदन देण्यात आले.

# वसंतदादा सूत गिरणीची अखेर विक्री

**जयसिंगपूर :** वस्त्रोद्योगातील नामांकित व वसंतदादा पाटील यांचे नाव असणाऱ्या कुपवाड येथील वसंतदादा सहकारी सूत गिरणीची विक्री अखेर लिलावात ३२ कोटी ७६ लाख रुपयांना झाली. सांगली महापालिका क्षेत्रातील वसंतदादांचे नाव असणारी आणखी एक संस्था नामशेष झाली. लिलावाचे अंतिम चित्र स्पष्ट झाले. त्यात मिरजेच्या महाबळ ग्रुपकडे सूत गिरणीच्या स्थावर मालमत्तेची मालकी जाणार असल्याचे अधोरेखित झाले.

अवसायक डॉ. एन. एस. जाधव यांनी आज पत्रकार परिषदेत वसंतदादा सूत गिरणीच्या निविदाप्रक्रियेच्या अंतिम टप्प्याची माहिती दिली. २७ मे रोजी झालेल्या वाटाघाटीच्या फेरीत मिरजेच्या संजय गोपाळ दामले यांनी २७ कोटी २७ लाखांची सर्वाधिक बोली लावली होती. ती शासनाच्या रेडिरेकनर व बाजारमूल्य भावाने निश्चित केलेल्या सर्वाधिक ३१ कोटी ६१ लाख रुपयांपेक्षा (अपसेट प्राईस) कमी होती. त्यामुळे सांगली शहरातून याविषयी विरोधी मते व्यक्त करण्यात आली. या पार्श्वभूमीवर वस्त्रोद्योग संचालक पराग जैन यांनी मिरजेच्या महाबळ ॲटोचे संचालक व निविदाधारक संजय दामले यांना रक्कम वाढवून देण्याविषयी सांगितले. चर्चेअंती श्री. दामले यांनी ३२ कोटी ७६ लाख रुपयांची बोली जाहीर केली. अपसेट प्राईसपेक्षा सुमारे १५ लाख रुपयांनी बोलीची रक्कम जादा असल्याने वस्त्रोद्योग संचालकांनी शासकीय अधिकारांचा वापर करून लिलाव निश्चित केला. त्याअनुषंगाने संजय दामले यांना वसंतदादा सूत गिरणीच्या मालमत्ता हस्तांतरसंदर्भातच्या सर्व प्रक्रिया पूर्ण करण्याचे आदेश त्यांनी अवसायक श्री. जाधव यांना दिल्या आहेत.

डॉ. जाधव यांनी सांगितले, ''अटींनुसार खरेदीदाराने एक महिन्याच्या आत सर्व रक्कम जमा करणेची आहे. या रकमेतून महाराष्ट्र सहकारी नियमानुसार प्राधान्यक्रमाने देणी दिली जातील. कामगारांची १६ कोटी रुपयांची सर्वाधिक देणी आहेत. इतर देणेकऱ्यांच्या मूळ देणी रकमेचा विचार केला जाणार आहे.

वसंतदादा सूतगिरणीच्या येथील हजरत लाडले मशायक देवस्थानच्या इनाम जमिनी शासनाने अधिग्रहित केल्या होत्या. एकूण क्षेत्र १७.४६ हेक्टर इतके आहे. कुपवाडमधील सर्व्हे क्र. २४३, २६४, २६५ व २९४ व त्यातील पोटहिस्से यांचा समावेश आहे.

फेब्रुवारी २००२ रोजी वसंतदादा सूत गिरणी बंद पडली. महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाने वीजबिलाच्या ११ कोटी रुपयांच्या थकबाकीपोटी वीजपुरवठा बंद केल्यानंतर संस्थेचे अस्तित्त्व संपण्यास सुरवात झाली. सुमारे ११०० हून अधिक कामगार सूतगिरणीत काम करीत होते. या अकराशे कुटुंबासह यशवंतनगरसह परिसरातील अनेकांचे भवितव्य सूतगिरणी बंद पडल्याने धोक्यात आले.

३ सप्टेंबर २००७ रोजी सूत गिरणी अवसायनात निघाली. पहिले अवसायक मिरजेचे उपनिबंधक महेश कदम होते. त्यांनी कामगारांच्या मागण्यांकडे दुर्लक्षकच केले. २ सप्टेंबर २००८ रोजी डॉ. जाधव यांनी सूत गिरणीचा अवसायक म्हणून कार्यभार हाती घेतला. वसंतदादा कामगार कृती समितीचे सलभद्र पाटील, बबन पवार यांच्यासह कार्यकर्त्यांनी अखंड प्रयत्न केले. न्यायालयात आपल्या रकमेविषयी धाव घेतली. २३ जूनपूर्वी सूत गिरणीचा लिलाव करा व कामगारांची देणी द्या, असा उच्च न्यायालयाने आदेश दिल्याने लिलाव प्रक्रिया करणे प्रशासनाला भाग पडले. दोनदा फेरनिविदा, तडजोड बैठका, अपसेट प्राईसपेक्षा कमी मागणी आल्यानंतरचा विरोध अशा पार्श्वभूमीवर संजय दामले यांनी अखेर ३२ कोटी ७६ लाख रुपयांची सर्वाधिक बोली लावून 'डाव' जिंकला व मिरजेच्या महाबळ ग्रुपने ४३ एकरची मध्यवस्तीत जागा मिळविली आहे.

वसंतदादा सूत गिरणीची मोक्याची जागा लिलावात घेणारे संजय दामले महाबळ ऑटो मिरजचे संचालक आहेत. एक हजार कोटींची उलाढाल असणारा महाबळ ग्रुप 'ऑटो' पार्टस् बनवितो. उत्तराखंड, पुणे, मिरज येथे कंपनीचा पसारा आहे. महाआघाडीच्या सर्वेसर्वांशी त्यांचा घनिष्ठ संबंध आहे. विकसनासाठी वसंतदादा सूतगिरणीची मोक्याची, राज्यमार्गालगतची व भविष्यात महापालिका क्षेत्राचे केंद्र समजल्या जाणाऱ्या पट्ट्यातील जागा त्यांनी विशेष लक्ष घालून यंत्रणेचा उपयोग करून पटकाविली असल्याचे स्पष्ट झाले आहे.

# ऊस उत्पादन घेण्यासाठी खताचे महत्त्व

महाराष्ट्राच्या विकासात सहकार व ऊस साखर व्यवसायाचा मोठा वाटा आहे. सध्या तरी साखर व्यवसाय आणि साखर कारखाने ऊस भरपूर नसल्याने अडचणीत आहेत. पुढे दोन तीन वर्षात साखर व्यवसाय सुधारेल. मात्र तोपर्यंत सध्या निर्माण झालेल्या संकटातून धाडसाने आणि तंत्रशुद्ध पद्धतीने पुढे जाणे जरुरीचे आहे. व्यवसाय वाचविण्यासाठी शेतकरी जगला पाहिजे त्याची आर्थिक परिस्थिती सुधारलीच पाहिजे, त्याचबरोबर साखर कारखाने टिकायला पाहिजेत याकडे लक्ष दिले पाहिजे. त्याकरीता दर हेक्टरी ऊस उत्पादन जादा मिळविणे व साखर उताऱ्यात अधिक वाढ होणे गरजेचे आहे. ऊस उत्पादन घेण्यासाठी पीक व्यवस्थापनामधील खत व्यवस्थापन हा एक महत्त्वाचा घटक आहे. ऊस असो अथवा कोणत्याही वनस्पतीचे पूर्ण वाढ होण्यासाठी १६ ते १७ अन्नद्रव्याची गरज असते आणि हे अन्नद्रव्य पिकाना जमिनीचा माध्यमातून मिळते आणि हे अन्नद्रव्य पिकाना जमिनीचा मध्यमातून मिळते आणि हे अन्नद्रव्य पिकाना जमिनीचा माध्यमातून मिळते.

बहुतेक सर्व जमिनीत पिकांना लागणाऱ्या सर्व आवश्यक अन्नद्रव्याचा पुरवठा हा बहुदा अपूरा असतो त्यामुळे पिकांची पूर्ण वाढ होण्यासाठी ही अन्नद्रव्ये आपण रासायनिक खताद्वारे देत असतो. रासायनिक खतांचा कार्यक्षम वापर होण्यासाठी आणि त्यातील पोषकद्रव्ये हवेद्वारे किंवा निचऱ्यावाटे वाया जाऊ नये म्हणून ऊस वाढीच्या वेगवेगळ्या अवस्थेत खत व्यवस्थापनातील काही महत्त्वाच्या गोष्टीकडे लक्ष देणे गरजेचे आहे. खताची योग्य निवड, मात्रा, वेळ आणि पद्धतीकडे लक्ष देणे गरजेचे आहे. ऊसाचा सर्वांगीन वाढीसाठी खालील प्रमाणे खत मात्रा द्यावी

(किलो प्रती हेक्टरीला)

| अ. नं. | हंगाम | नत्र | स्फूरद | पालाश |
|---|---|---|---|---|
| १ | आडसाली | ४०० | १७० | १७० |
| २ | पूर्व हंगाम | ३४० | १७० | १७० |
| ३ | सुरू | २५० | ११५ | ११५ |
| ४ | खोडवा | २५० | ११५ | ११५ |

खताची मात्रा ठरवित असताना माती पीरक्षण करुन त्या प्रमाणे वेगवेगळ्या हंगामात खत मात्रा द्यावी.नदीकाठच्या क्षेत्रासाठी झिंक सल्फेट ५० किलो प्रती हेक्टरी शेणखतात मिसळून लावणीचे वेळी द्यावेत. त्यामुळे ऊस व साखर उत्पादन वाढ होते. साखर कारखान्यात उपलब्ध असणारे मळी खत (प्रेसमड कक) सेंद्रिय खत म्हणून वापरावे.



ऊस पिकास सुरूवातीच्या मुख्य वाढीच्या काळात म्हणजे ४ते ६ महिन्यापर्यंत नत्र, स्फूरद व पालाश द्यावे, ??? नत्र चारवेळा विभ्यागून द्यावे आणि स्फूरद व पालाश दोन समान हप्त्यात पान १९ वर ▶

पिक-पाणी

**डॉ. जिनेंद्र धनपाल चौगुले**
प्लॉट नं. २९, चंद्रधन, माहेर हॉस्पिटलजवळ नांदणी रोड, जयसिंगपूर. येथे संपर्क साधावा. फोन २२४५११९. मो. ९९२२७७२८१५

# ऊस उत्पादन घेण्यासाठी खताचे महत्त्व

▸ पान १८ वरुन

लागणीच्या व भरणीचे वेळी विभागून द्यावे. अशाप्रकारे सर्व खताच्या मात्रा ५ ते ६ महिन्यात पूर्ण कराव्यात. नत्रचा पहिला हप्ता १०%, लागणीचे वेळी ४०% ६ ते ८ आठवड्यात, १०% रक्तमात्रा १० ते १२ आठवड्यानी आणि उरलेला चौथा हप्ता ४०% भरणीचे वेळी द्यावा.

खत विसकटून अगर जमिनीवर पसरुन देण्याऐवजी ती पिकाच्या मूळाच्या कार्यक्षेत्रात कशी उपलब्ध होतील या दृष्टीने खतमात्रा देणे फार महत्त्वाचे आहे. त्यामुळे रासायनिक खते जमिनीत आड करुन किंवा कूरीचे सहाय्याने सरीत पेरून द्यावी. ठिबक किंवा फवारा पद्धतीने जर खत दिली तर त्याची उपयुक्तता वाढते व अन्नद्रव्ये वाया जान्याचे प्रमाण कमी झाल्यामुळे एकूण खर्चात बचत होते. युरीया हा पाण्यात जलदगतीने विरघळतो तसेच जमिनीवर पडला तर हवेद्वारे त्यातील नत्र उडून वाया जाऊ शकते म्हणून तो विमावून



व माती आड करून द्यावा. नत्र हा पिकाच्या वाढीसाठी आवश्यक असणाऱ्या अन्नघटकापैकी सर्वात महत्त्वाचा अन्नघटक आहे.

स्फूरद व पालाश युक्त खतामधील अन्नद्रव्याची उपलब्धता उशीरा होते तसेच स्फूरद अन्नद्रव्याची हालचाल फार कमी होत असल्यामुळे ही अन्नद्रव्ये जमिनीत ५ते६ सें.मी. खोल अंतरावर, दोन समान हप्त्यात विभागून द्यावीत तसेच जादा पावसाच्या प्रदेशात हलक्या जमिनीमध्ये व ज्या जमिनीमध्ये सेंद्रिय कर्बचे प्रमाण कमी असते अशा जमिनीमध्ये स्फूरदासारखा खते सेंद्रिय खतामध्ये मिसळून द्यावीत. म्हणजे कार्यक्षमता वाढवण्यास मदत होते. पिकांच्या पूर्वावस्थेत स्फूरदचा भरपूर पुरवठा होणे तसेच फुटव्याची वेळी फारच महत्त्वाचे आहे. स्फुरदामुळे पिकाची पूर्ण वाढ लवकर बी अथवा फळे लवकर लागतात. ह्या स्फूरद द्रव्याची जर पिकाला कमतरता भासत असेल तर पिकांची वाढ खुंटते. साखरे सारख्या पिष्टमय पदार्थाचा निर्मितीस व त्यांचे एकमेकांत रुपांतर होण्यास पालाशचा पिकाला जरुरी आहे पालाषामुळे ऊसाचा दर्जा उंचावतो. जादा ऊस उत्पादन घेण्यासाठी खताचे व्यवस्थापनाचा वरील गोष्टींचा विचार करुन फायदा करुन घ्यावा.